**ठळक बातम्या**

- राज्याच्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी जाहीर झालेली कर्जमाफी योजना, कर्ज देण्यासाठी पात्र अशा कोणत्याही संस्थेकडून घेतलेल्या कर्जासाठी लागू राहील,असं मुख्यमंत्र्यांचं स्पष्टीकरण

- इंधनाचा पुरेसा साठा असून तुटवड्याच्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असं तेल कंपन्यांचं आवाहन

- घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किंमतीत साठ रुपये, तर व्यावसायिक वापराच्या सिलिंडरच्या किमतीत ११५ रुपये वाढ

- लोकसभेत सभापती ओम बिरला यांच्याविरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर येत्या सोमवारी सभागृहात चर्चा होणार

**आणि**

- ऑल इंग्लंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या उपान्त्य फेरीत आज लक्ष्य सेन चा सामना कॅनडाच्या व्हिक्टर लाई बरोबर

**<><><><><>**

राज्याच्या अर्थसंकल्पात जाहीर झालेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना, कर्ज देण्यासाठी पात्र अशा कोणत्याही संस्थेकडून घेतलेल्या कर्जासाठी लागू राहील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे. नागपूरमधे ते वार्ताहरांशी बोलत होते. शेतकऱ्यांची ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकित राहिलेली २ लाख रुपये पर्यंतची कर्ज माफ करण्याच्या दृष्टीनं काल अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. त्याबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. ही कर्जमाफी बँकेला नसून शेतकऱ्यांना

आहे. त्यामुळे प्रत्यक्ष शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळावा याकरता अंमलबजावणीची कार्यपद्धती तयार करण्यात येत आहे, असं ते म्हणाले

....... **होल्ड- बाईट- मुख्यमंत्री**

नागपूरमधे अमरावती रोडवर एक्स एस आय ओ या लॉजिस्टिक आणि इंडस्ट्रियल पार्कचं लोकार्पण आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं.त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. इंधन दरवाढ तसंच गॅसच्या पुरवठ्याबाबत नागरिकांमध्ये घबराट होईल अशा कुठल्याही बातम्या पसरू नयेत याची काळजी घेण्याचं आवाहन त्यांनी प्रसारमाध्यम प्रतिनिधींना केलं . यासंदर्भात सर्व माहिती केंद्र सरकार वेळोवेळी देत आहे असं ते म्हणाले.

**<><><><>**

होर्मूझच्या सामुद्रधुनीतली जलवाहतूक बंद झाल्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या पुरवठ्यात खंड पडल्याच्या समाज माध्यमांवर प्रसृत झालेल्या बातम्या पूर्णपणे निराधार असून भारताकडे पुरेसे इंधन साठे आणि पर्यायी पुरवठा स्रोत आहेत असं हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीनं स्पष्ट केलं आहे. इंधन पुरवठ्यामधला व्यत्यय किंवा तुटवडा या बातम्या दिशाभूल करणाऱ्या असून नागरिकांनी या अफवांवर विश्वास ठेवू नये तसंच पेट्रोल पंपांवर गर्दी करू नये, असं कंपनीनं ट्विट करून सांगितलं आहे.

**<><><><>**

घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या किंमतीत साठ रुपयांनी वाढ झाली आहे. हे नवे दर महानगरांमध्ये लागू झाले आहेत. दर वाढीनंतर आता एका सिलेंडरची किंमत दिल्लीमध्ये ९१३ रुपये, मुंबईत ९१२ रुपये ५० पैसे, कोलकत्ता इथं ९३९ रुपये आणि चेन्नईमध्ये ९२८ रुपये ५० पैसे इतकी झाली आहे. व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किंमतीत देखील ११५ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे.

**<><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या बातम्या भडक दृष्यांसह दूरचित्रवाहिन्यांनी दाखवू नयेत असं केंद्रसरकारनं सांगितलं आहे. अशा प्रकारे सनसनाटी बातम्यांच्या स्वरुपात वार्तांकन केलं तर परिणामतः घबराट पसरू शकते. त्यामुळे वृत्तवाहिन्यांसाठीचं टेलिव्हिजन रेटींग पॉईंट्सचं मानांकन ४ आठवड्यांसाठी स्थगित करण्याचे आदेश केंद्रसरकारनं दिले आहेत.

<><><><><>

पश्चिम आशियातला संघर्ष आणखी तीव्र झाला आहे. अमेरिका आणि इस्राएल विरुद्ध इराण या आज युद्धाचा आठवा दिवस असून दोन्ही बाजूंनी सातत्यानं हल्ले सुरु आहेत. अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्यांमधे इराणमध्ये महिला आणि मुलांसह १ हजार ३३२ नागरिक मृत्यूमुखी पडले असल्याची माहिती, संयुक्त राष्ट्रसंघातले इराणचे राजदूत आमीर सईद इरावानी यांनी दिली. दरम्यान अमेरिका इस्रायलला आणखी शस्त्रपुरवठा करत आहे. १५ कोटी १० लाख नवीन शस्त्रास्त्र विक्री प्रस्तावाला राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनानं मंजुरी दिली आहे.

इराणबरोबर कोणत्याही वाटाघाटी करायला ट्रम्प यांनी नकार दिला आहे. इराणनं बिनशर्त शरणागती पत्करावी, अमेरिका आणि त्याचे मित्रराष्ट्र इराणला विनाशाच्या गर्तेतून बाहेर काढून, पूर्वीपेक्षा उत्तम राष्ट्र बनवण्यासाठी अथक परिश्रम करतील असं त्यांनी म्हटलं आहे.

चुकीच्या गृहितकांआधारे आखाती देशांवर हल्ले करणं इराणनं थांबवावं, असं आवाहन सौदी अरेबियानं केलं आहे.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त नवी दिल्लीतल्या माणेकशॉ सेंटर इथं आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सहभागी होणार आहेत. महिला आणि बालविकास मंत्रालयानं हा कार्यक्रम आयोजित केला असून यामध्ये सुमारे हजार पेक्षा अधिक महिला उपस्थित राहतील, असा अंदाज आहे. या कार्यक्रमात कामगार

वर्गातल्या आणि स्वयं सहाय्य्यता गटातल्या महिलांचं सक्षमीकरण या विषयांवर विचार मंथन होईल. या कार्यक्रमाचं थेट प्रसारण आकाशवाणीवरुन होणार आहे.

<><><><><>

लोकसभेत सभापती ओम बिरला यांच्याविरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर येत्या सोमवारी सभागृहात चर्चा होणार आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा येत्या सोमवार, नऊ मार्चपासून सुरू होत असून त्याच दिवशी या ठरावावर चर्चा अपेक्षित आहे. अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात विरोधी पक्षांनी लोकसभा सचिवालयाकडे हा अविश्वास ठराव दाखल केला होता. या ठरावावर ११८ खासदारांच्या स्वाक्षऱ्या आहेत. काँग्रेसचे खासदार मोहम्मद जावेद, के. सुरेश आणि मल्लिकार्जुन खरगे हा प्रस्ताव मांडणार आहेत.

दरम्यान काँग्रेस आणि भारतीय जनता पक्षानं नऊ आणि दहा मार्च रोजी सर्व सदस्यांना सभागृहात उपस्थित राहण्याचा व्हिप जारी केला आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्ली इथं सुमारे ३३ हजार ५०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचं तसंच अंदाजे १८ हजार ३०० कोटी रुपयांच्या दिल्ली मेट्रो प्रकल्पांचं उदघाटन आणि पायाभरणी करणार आहेत. त्यासह सुमारे सव्वा बारा किलोमीटर आणि दहा किलोमीटर लांबीच्या दिल्ली मेट्रोच्या दोन नवीन कॉरिडॉरचं उदघाटन देखील त्यांच्या हस्ते होणार आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना जनऔषधी दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. प्रधानमंत्री भारतीय जनऔषधी परियोजनेच्या लाभार्थ्यांना शुभेच्छा देत त्यांनी जनऔषधी केंद्रांचं महत्त्वही अधोरेखित केलं आहे. या केंद्रांमुळे अगणित कुटुंबाना योग्य उपचार मिळून त्यांचा औषधाचा खर्च कमी झाल्याचही त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात मह्टलं आहे.

<><><><><>

भारत-न्यूझीलंड दरम्यान उद्या अहमदाबाद इथं होणाऱ्या ICC टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यासाठी रेल्वेनं दिल्ली-अहमदाबाद दरम्यान १९ डब्यांची विशेष गाडी चालवण्याचा निर्णय घेतला आहे. आज रात्री पावणे बारा वाजता ही गाडी दिल्लीहून सुटेल तर उद्या दुपारी अडीच वाजता साबरमतीला पोहोचेल. दिल्ली, गुरुग्राम, जयपूर मार्गे ही विशेष ट्रेन साबरमतीला पोहोचणार आहे.

<><><><><>

बर्मिंगहॅम इथं सुरु असलेल्या ऑल इंग्लंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये जागतिक क्रमवारीत १२ व्या स्थानावर असलेल्या लक्ष्य सेननं पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्यपूर्व फेरीत त्यानं चीनच्या ली शी फेंगचा २१-१३,२१-१६ असा पराभव केला. उपान्त्य फेरीत त्याचा सामना कॅनडाच्या व्हिक्टर लाई बरोबर होईल. ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो या मिश्र दुहेरी जोडीनं हाँगकाँगच्या तांग चुन मान आणि त्से यिंग सुएत विरुद्ध दुखापतीमुळं माघार घेतल्यानंतर या स्पर्धेत लक्ष्य सेन हा एकमेव भारतीय खेळाडू राहिला आहे.

//<><><><><>//